पाक्षिक

प्रदेश बीजेपी

# मनोगत



प्रदेश कार्यालयात विजयोत्सव

मुंबई ● वर्ष: 7 ● अंक: 22 ● 16 नोव्हेंबर 2025 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.



# धन्यवाद बिहार



## अध्यक्षीय मनोगत

# बिहारच्या जनतेने फेक नरेटिव्ह नाकारले

सर्वप्रथम बिहारच्या जनतेचे मी अभिनंदन करतो. गेल्या अनेक महिन्यांपासून मतदारयादी शुद्धीकरणावरून काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी बिहारमध्ये अपप्रचाराची राळ उडवली होती. सामान्य माणसाच्या मनात संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांविषयी अविश्वास निर्माण करण्याचा हा डाव बिहारच्या जनतेने उधळून लावला आहे. आपल्याला जनता का नाकारत आहे, याचा शोध घेण्याऐवजी राहुल गांधी आणि त्यांचे सहकारी मतदार यादीतील घोळ यासारख्या मुद्यांवरून मतदारांच्या मनात देशातील लोकशाही व्यवस्थेविषयी संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत होते. या मंडळींना बिहारच्या जनतेने सणसणीत चपराक लगावली आहे. सर्वप्रथम हरयाणा, महाराष्ट्र, दिल्ली आणि आता बिहार निवडणुका जिंकत भारतीय जनता पार्टीने आपले जनतेतील स्थान किती बळकट होत चालले आहे, याची प्रचिती दिली आहे. बिहारमधील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या दणदणीत विजयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांचाही वाटा आहे, हे सांगण्यात मला अभिमान वाटतो. मुख्यमंत्री देवेंद्रजी, विनोदजी या दोघांचेही मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. देवेंद्रजींनी बिहारमध्ये ज्या-ज्या ठिकाणी सभा घेतल्या त्या सर्व जागी भाजपा आणि मित्र पक्षांचे उमेदवार विजयी झाले आहेत. केंद्रीय नेतृत्वाने विनोदजी तावडे यांच्यावर ३ वर्षापूर्वी बिहारची संघटनात्मक जबाबदारी सोपविली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील सर्व मित्रपक्षांना विश्वासात घेत, त्यांना सन्मान देत विनोदजींनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी एकसंघ बनविली. त्याचबरोबर निवडणुकीतील अनेक छोट्या-मोठ्या डावपेचांच्या आखणीतही विनोदजींची महत्वाची भूमिका होती. बिहारच्या जनतेने केंद्रातील मोदी सरकारच्या सर्वांगीण विकासाच्या विविध प्रकल्पांना आणि बिहारमधील राज्य सरकारच्या विकास योजनांना कौल देत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला अभूतपूर्व विजय मिळवून दिला आहे. बिहारच्या सर्वसामान्य माणसाला विकासासाठी डबल इंजिन सरकार हवे आहे हे या निकालातून दिसले आहे. २०१० मध्येही बिहारच्या मतदारांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला असाच दणदणीत विजय मिळवून दिला होता. खोटा प्रचार करून अराजक निर्माण करण्याच्या राहुल गांधींचा प्रयत्न मतदारांनी हाणून पाडला आहे. मतदारांचा कौल नम्रपणे स्वीकारण्याऐवजी राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे या काँग्रेस नेत्यांनी आपले शेपूट अजूनही वाकडे आहे, हे दाखवले आहे. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत ‘संविधान खतरे में है’, हा अपप्रचार करून काँग्रेस आणि डाव्या मंडळींनी जनतेच्या मनात संभ्रम निर्माण केला. काँग्रेस आणि डाव्या मंडळींच्या या अपप्रचाराला आपण बळी पडल्याचा मतदारांना आता पश्चाताप होत आहे. बिहार हे विकासाच्या बाबतीत अत्यंत मागास राज्य म्हणून ओळखले जात होते. भाजपा आणि संयुक्त जनता दलाची बिहारमध्ये सत्ता आल्यानंतर तेथील चित्र बदलू लागले. २०१४ मध्ये केंद्रात मोदी सरकार सत्तेवर आल्यावर बिहारच्या विकासाने आणखी वेग पकडला. त्यामुळेच सर्वसामान्य मतदारांनी काँग्रेसच्या अपप्रचारावर विश्वास ठेवला नाही. बिहारमधील युवा मतदारांनी आणि महिलांनी भाजपा आणि मित्र पक्षांच्या उमेदवारांना भरभरून मतदान केले. बिहारच्या जनतेचे मी पुन्हा अभिनंदन करतो.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग




संपादक : गणेश हाके
सल्लागार : माधव भांडारी
आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

चंद्रहास मिरासदार
सजावट व मांडणी : गौतम आर्य
सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी
विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे
पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर
उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

बिहारच्या जनतेने दिला विकासाला कौल ०४



‘तीन वर्षांची मेहनत सार्थकी’ ०७



देवेंद्र फडणवीस यांच्या प्रचार सभांचाही बिहार विजयात वाटा ०८



पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात बिहारचा सर्वात मोठा विकास १०




जनजातींच्या योगदानाचा गौरव १२



‘वंदे मातरम्’ - सांस्कृतिक राष्ट्रवादाची पहिली घोषणा १४



हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# बिहारच्या जनतेने दिला विकासाला कौल



बिहार विधानसभा निवडणुकीचे निकाल अनेक अर्थाने लक्षणीय ठरणार आहेत. या निवडणुकीत मतदारांनी केंद्रातील मोदी सरकारच्या आणि बिहारमधील एनडीए सरकारच्या विकास योजनांना आणि सुशासनाला मोठा कौल देताना काँग्रेसच्या मतचोरीसारख्या अपप्रचाराला सपशेल नाकारले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिश्मा अजूनही कायम आहे, हे बिहारच्या निवडणुकीने पुन्हा दाखवून दिले आहे.

**बिहारच्या** मतदारांचा हा कौल काँग्रेससह सर्व विरोधकांनी नम्रपणे स्वीकारला पाहिजे. मात्र संजय राऊत यांच्यासारख्या काही मंडळींनी निवडणूक आयोगाला लक्ष्य करत वास्तव स्वीकारण्यापासून पळ काढला आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने विविध कारणांनी चर्चेत असलेल्या बिहारसारख्या राज्याच्या प्रश्नांवर, तेथील विकासाच्या मुद्यांवर चर्चा झाली. मोदी सरकारने गेल्या ११ वर्षात बिहारमध्ये पायाभूत सुविधा विकासाच्या अनेक योजना सुरू केल्या आहेत. या योजनांना नितिश कुमार सरकारच्या योजनांची साथ मिळाल्याने बिहारच्या जनतेला त्याची फळे प्रत्यक्ष स्वरूपात मिळू लागली आहे. मतदारांनी त्याचीच पोचपावती विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला भरघोस मतदान करून दिली आहे.




भारतीय उद्योग महासंघाच्या ताज्या अहवालानुसार बिहारची अर्थव्यवस्था २०३०-२०३१ पर्यंत सुमारे २१९ अब्ज डॉलर्स एवढी होण्याचा अंदाज आहे. २०४६-२०४७ पर्यंत बिहारची अर्थव्यवस्था १.१० ट्रिलियन डॉलरपर्यंत वाढेल, असाही अंदाज उद्योग महासंघाच्या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. एकेकाळी बिमारू राज्य अशी हेटाळणी झालेल्या बिहारमध्ये १.८१ लाख कोटी एवढे गुंतवणुकीचे सामंजस्य करार झाले आहेत. देश-विदेशातील गुंतवणुकदारांना बिहार हे गुंतवणुकीस योग्य राज्य वाटू लागले आहे, असा निष्कर्ष यातून निघतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिहारसाठी सुमारे ४० हजार कोटी रुपयांच्या रेल्वे विमानतळ, वीज आदी प्रकल्पांचे लोकार्पण आणि पायाभरणी झाली आहे. बिहारमधील पूर्णिया विमानतळाची टर्मिनल इमारत ५ महिन्यांपेक्षा कमी काळावधीत बांधण्यात आली. या नवीन विमानतळामुळे पूर्णिया आणि सीमांचलचा देशातील मोठ्या शहरांशी आणि व्यावसायिक केंद्रांशी थेट संपर्क होणार आहे. मोदी सरकारने बिहारमध्ये अनेक राष्ट्रीय महामार्गांचे बांधकाम सुरू केले आहेत. त्याचबरोबर अनेक रेल्वे मार्गांचे दुहेरीकरण सुरू झाल्याने बिहारमधील दळणवळण सुविधा आणखी वेगवान होणार आहे. केंद्र सरकारने २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पात बिहारच्या मखाना उत्पादक शेतकऱ्यांसाठी मखाना बोर्ड स्थापण्याची घोषणा केली आहे. त्याखेरीज बिहारमध्ये खाद्य प्रक्रिया संस्था उभारण्यावर तसेच या राज्यातील तूर, उडीद, मसूर या पिकांचे उत्पादन वाढवण्यावर केंद्र सरकारने भर दिला आहे. मोदी सरकारच्या पंतप्रधान आवास, उज्ज्वला यासारख्या अनेक योजनांचे लाखो लाभार्थी बिहारमध्ये आहेत. मोदी सरकार लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात सरकारी अनुदान, अर्थसहाय्य जमा करत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेचा मोदी सरकारवर प्रचंड विश्वास आहे. या विश्वासाचे प्रतिबिंब विधानसभा निवडणुकीच्या निकालात पडलेले दिसत आहे. १९९० ते २००५ अशी सलग १५ वर्षे बिहारमध्ये लालुप्रसादांची सत्ता होती. या काळात बिहारच्या जनतेने जंगलराज अनुभवले. त्या काळात बिहारमध्ये संविधान आणि कायद्याचे राज्य नव्हते तर यादव कुटुंबाच्या एकाधिकारशाहीचे साम्राज्य होते. त्या काळात यादव कुटुंबियांच्या आश्रयाखाली पोसली गेलेली गुंडगिरी बिहारची जनता अजून विसरलेली नाही. नितिश कुमार आणि भाजपाच्या आघाडी सरकारने यादव कुटुबियांचे गुंडाराज निधार्राने मोडून काढले. लालुप्रसादांच्या जंगलराजमधील दहशतवाद आणि एनडीए सरकारच्या काळातील गुंडगिरी मोडून काढण्याची मोहीम यातील फरक सामान्य जनता अनुभवते आहे. त्यामुळे सामान्य मतदारांनी या निवडणुकीत भाजपा आणि नितिश कुमार यांच्या पदरात मतांचे भरघोस दान घातले आहे.

बिहारमधील सर्वच प्रश्न संपले आहेत, असा दावा कोणी करणार नाही. मात्र सामान्य जनतेचे प्रश्न हाती घेऊन त्यावर लढण्याऐवजी विरोधक मतचोरीसारख्या फेक नरेटीव्हवर विसंबून राहिले त्याचा फटका विरोधकांना बसला आहे. या निवडणुकीआधी काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी निवडणुक आयोगाच्या मतदारयादी दुरुस्ती

अभियानाला विरोध करणारी यात्रा काढली होती. संपूर्ण बिहारमध्ये फिरलेल्या या यात्रेत राष्ट्रीय जनता दलाचे तेजस्वी यादव हे सर्व ताकदीनिशी सहभागी झाले होते. या यात्रेपूर्वी राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन बिहारमधील मतदारयादी दुरुस्ती कार्यक्रमात भाजपा विरोधात मतदारांची नावे पद्धतशीरपणे वगळी जात असल्याचा आरोप केला होता. या पत्रकार परिषदेत साधरीकरण करत असताना राहुल गांधींनी नावे वगळली गेलेल्या काही मतदारांना पत्रकारांपुढे उभे केले होते. काही वृत्त वाहिन्यांनी राहुल गांधीच्या आरोपातील हवा लगेच काढून टाकली होती. निवडणूक आयागोच्या मतदारयादी दुरूस्ती कार्यक्रमाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली गेली होती. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाची बाजू समजून घेत या कार्यक्रमाला असलेले आक्षेप फेटाळून लावले होते, तरीही राहुल गांधींनी मतदारयादीचे तुणतुणे वाजवणे सुरूच ठेवले होते. बिहारच्या निकालातून विरोधकांनी धडा घेणे अपेक्षित आहे. सतत जनतेच्या मनात संभ्रम निर्माण करण्याचे प्रयत्न यशस्वी होत नाहीत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत संविधान बदलण्याच्या अपप्रचारामुळे काँग्रेसला फायदा झाला. जनतेत जाऊन प्रत्यक्ष काम करण्याऐवजी अशा अपप्रचाराची मदत विरोधकांनी घेतली तर मतदार विरोधकांना नाकारतील, हाच बिहाराच्या निकालाचा सांगावा आहे. ■



# ‘तीन वर्षांची मेहनत सार्थकी’



‘सप्टेंबर २०२२ मध्ये एके दिवशी सकाळी मला पक्षाने बिहारची जबाबदारी सोपवली. त्याला आता तीन वर्षे होऊन गेली. या तीन वर्षांतील मेहनत आजच्या बिहार विधानसभेच्या निकालाने सार्थकी लागली...,’ या शब्दांत भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस व बिहारचे प्रभारी विनोद तावडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

**बिहार** विधानसभा निवडणुकीतील आजच्या निकालांमध्ये आणि भाजपच्या यशात तावडे यांचा मोठा वाटा आहे. त्या विषयी बोलताना ते म्हणाले, ‘नितीशकुमार हे भाजपला सोडून पुन्हा लालूप्रसाद यादव यांच्याबरोबर सरकार तयार करण्याची जुळवाजुळव करीत असल्याच्या बातम्या दिल्लीत त्या वेळी पोहोचत होत्या. वास्तविक माझ्याकडे राजस्थानची जबाबदारी देण्याचे निश्चित झाले होते; मी तशी तयारीही करीत होतो. नितीशकुमार यांच्या खेळीचा अंदाज घेऊन पक्षश्रेष्ठींनी मला बिहारमध्ये जायला सांगितले. त्यानंतर मी गेली तीन वर्षे बिहारमध्ये तळ ठोकून आहे.’ ‘या प्रवासामध्ये नितीशकुमार यांना पुन्हा भाजपकडे वळविणे, मागच्या वर्षीची लोकसभेची निवडणूक, त्यामध्ये ‘एनडीए’ला चाळीसपैकी ३० जागा मिळणे हे महत्त्वाचे टप्पे आहेत; पण या सर्व काळामध्ये ‘एनडीए’मधील घटक पक्षांना एकत्र ठेवणे, त्यांच्याशी संवाद साधणे ही मोठी जबाबदारी होतीच. त्याचबरोबर जनतेसाठी कल्याणकारी योजना बिहारमध्ये आणणे व सरकारच्या माध्यमातून त्या प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारीही होती,’ असे तावडे म्हणाले. या यशाचे श्रेयही त्यांनी पक्षश्रेष्ठींना दिले.

### ‘रफ्तार पकड चुका है बिहार’

निवडणुकीपूर्वी ‘रफ्तार पकड चुका है बिहार’ ही टॅगलाइन आम्ही निश्चित केली होती. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच बिहारमध्ये विकासाच्या मुद्द्यावर मतदान व्हावे, यासाठी आम्ही प्रयत्न केले. त्याला यश आले. या निवडणुकीत भाजपला यादव, मुस्लिम किंवा इथल्या भाषेत अतिपिछडे म्हणजे मागासवर्गीय समाजामध्ये स्थान नसल्याचा प्रचार केला जात होता; पण एनडीएने मिळविलेल्या जागांपैकी ३० जागा या यादव, मुस्लिमबहुल आहेत. ६० जागा या मागासवर्गीयांचे प्राबल्य असलेल्या आहेत,’ असे ते म्हणाले. **(सौजन्य: दै. महाराष्ट्र टाइम्स)**

# देवेंद्र फडणवीस यांच्या प्रचार सभांचाही बिहार विजयात वाटा



● वेद कुमार

१८८ फुलवारी विधानसभा मतदारसंघ हा तोच मतदारसंघ आहे जिकडे एनआयएने पीएफआयशी संबंधित बिहारमधील सगळ्यांत मोठी धाड टाकली होती. हा मतदारसंघ मुस्लिमबहुल असल्याने संयुक्त जनता दला ला सोडण्यात आला. ह्या मतदारसंघात महागठबंधनाला विजयाची पूर्ण खात्री होती. जेडीयूचे उमेदवार श्याम रजक ह्यांच्या प्रचारासाठी देवेंद्र फडणवीस फुलवारीला गेले होते. जेडीयूच्या कार्यकर्त्यांना असा काय कानमंत्र दिला हे देवास ठाऊक, श्याम रजक ह्यांनी ३२६५७ मतांनी फुलवारी जिंकली!!

१३७ मोहिउद्दीन नगर मतदारसंघात राष्ट्रीय जनता दलाने इजया यादव या तेजस्वी यादव यांच्या नात्यातील ताईंना उमेदवारी दिली होती. स्वतः तेजस्वी यादव यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनवली होती. या मतदारसंघात देवेंद्र फडणवीस यांनी राजेशकुमार सिंग या भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारासाठी फक्त रॅलीच नव्हती घेतली, तर राजेशकुमारजी यांच्या कार्यकर्त्यांना मायक्रो मॅनेजमेंटच्या टिप्स देखील एक बैठक घेऊन दिल्या. परिणामी राजेशकुमार सिंग यांनी ११ हजार ६८२ च्या मताधिक्याने ही जागा जिंकून तेजस्वी यादव यांची प्रतिष्ठा धुळीस मिळवली.


बाबुलाल शौर्य हे चिराग पासवान यांचे जवळचे मानले जातात. त्यांच्यासाठी चिराग पासवान यांनी स्वतः देवेंद्र फडणवीस यांना एका रॅलीसाठी विनंती केली होती. १५१ परबत्ता या मतदारसंघात राष्ट्रीय जनता दलाने

एक प्रसिद्ध डॉक्टर संजीवकुमार यांना तिकीट दिले होते. देवेंद्रजी यांची रॅली आणि त्यानंतर त्यांनी घेतलेला लोकजनशक्ती पार्टीच्या कार्यकर्त्यांचा मेळावा याचा परिणाम असा झाला की बाबुलाल शौर्य प्रचंड मताधिक्याने विजयी झालेत.

७६ सिमरी बख्तयारपूर ह्या मतदारसंघात नितिशकुमार ह्यांचे मतदान असते! या मतदारसंघावरून LJP आणि JDU ह्यांच्यात मोठे भांडण झाले होते. शेवटी अमित शहा यांनी मध्यस्थी करून LJP च्या कोट्यात ही सीट टाकली. या जागेवर JDU चे कार्यकर्ते LJP ला मतदान करणार नाहीत अशी शक्यता त्यामुळे निर्माण झाली. प्रचाराच्या दरम्यान या मतदारसंघात केंद्रीय भाजपकडून देवेंद्र फडणवीस ह्यांना पाचारण करण्यात आले. त्यानंतर LJP आणि JDU यांच्यातील वैर संपले आणि आज LJP चे संजयकुमार सिंग यांनी राष्ट्रीय जनता दलाच्या युसूफ सलाहाउद्दीन ह्यांचा पराभव केला. या जागेवर मुस्लिम आणि यादव मतदारांनी नितिशकुमार यांचे मतदान असलेल्या जागेवरच त्यांचे नाक कापायचा जो प्लॅन केला होता तो निष्फळ ठरला.

९१ बोछाहन ही LJP साठी सगळ्यात अवघड सीट मानली जात होती. त्यात तिकडे राष्ट्रीय जनता दलाने एक 'पासवान'च मैदानात उतरवला होता. या मतदारसंघावर देवेंद्रजी यांनी आपले विशेष लक्ष केंद्रित केले होते. आज मतमोजणी संपली तेव्हा RJD चा पासवान हरला आणि पासवानच्या पक्षाची बेबीकुमारी तब्बल २०००० मतांनी जिंकली आहे!!

मगधच्या १२० अमनौर मतदारसंघाची अशी ख्याती आहे की इकडे जवळजवळ ३०% यादव मतदान आहे. या मतदारसंघात सुनिलकुमार यादव ह्यांना RJD ने उतरवलं होतं. ही अशी जागा होती जी JDU आणि BJP एकमेकांना स्वखुशीने देत होते..=, शेवटी भाजपने किशनकुमार मंटू यांना उमेदवारी दिली आणि त्यांना 'मार्गदर्शन' करायची जबाबदारी देवेंद्र फडणवीस यांच्यावर सोपवली. अतिशय अटीतटीच्या झालेल्या या लढतीत शेवटच्या फेरीनंतर केवळ ३ हजार ८२३ मतांनी मंटू विजयी झाले. यादवबहुल मतदारसंघात असा चमत्कार होईल यावर BJP, JDU आणि RJD यांना विश्वास नव्हता. पटनासाहिबमध्ये राहुल गांधी यांनी त्यांच्या जवळच्या शशांत शेखर यांना तिकीटही दिले आणि स्वतः



प्रचार देखील केला. भारतीय जनता पक्षाने रतनेश कुशवाह यांना तिकिट दिले आणि त्यांच्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी प्रचार केला. रतनेश खुशवाह यांनी ही निवडणूक ३८९०० मतांनी जिंकली. हॅशटॅग : फरक!

१४६ बेगुसराय मतदारसंघात कॉंग्रेसकडून अमिता भुषण यांना तिकीट देण्यात आले तर भाजपकडून कुंदनकुमार उमेदवार होते. या मतदारसंघात देवेंद्रजींचा रोड शो झाला होता. आलेल्या निकालानंतर कुंदनकुमार विजयी झालेत आणि अमिता भुषण रोडवर आल्यात. राहुल गांधी यांनी बिहारमध्ये कॉंग्रेस पक्षाच्या उमेदवारांसाठी ३३ जाहीरसभा घेतल्या आणि त्या ३३ पैकी ३३ जागांवर कॉंग्रेस उमेदवारांचा पराभव झाला आहे. दुसरीकडे देवेंद्र फडणवीस यांनीही बिहारमध्ये प्रचार केला. त्यात त्यांनी अनेक मतदारसंघात तर मित्रपक्षांच्या उमेदवारांचा प्रचार केलाय! दोन पक्षांमधील आणि दोन नेत्यांमधील फरक स्पष्ट दिसत आहे.

**निष्कर्ष: राहुल गांधी आणि कॉंग्रेसला निपटवायला देवेंद्रजीच पुरेसे आहेत. मोदींना चॅलेंज-बिलेंज करायच्या फंदात कॉंग्रेसने यापुढे पडू नये.**

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात बिहारचा सर्वात मोठा विकास


● प्रकाश गाडे

> बिहारचा बदल हा भाषणांचा नाही जमिनीवरच्या कामांचा पुरावा आहे. मागच्या १० वर्षांत बिहारने विकासाचा असा वेग पकडला की ६० वर्षांत जे नाही झालं ते एका दशकात झालं.

### आरोग्य क्रांती




- २०१४ ला सरकारी मेडिकल कॉलेज फक्त ६
- आज १७ (११ नवीन)
- ३ IIMS (पटना, दरभंगा, देवघर)
- १०+ सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल्स



### हायवे कॉरिडॉर

- १,५४०+ किमी राष्ट्रीय महामार्ग
- ८५०+ किमी नवीन चार-लेन हायवे
- बक्सर-भागलपूर हाय स्पीड कॉरिडॉर
- पटना-आरा-सासाराम ग्रीनफिल्ड कॉरिडॉर



### गंगावर मेगा ब्रिजेस

- कच्चीदरगाह-बिदुपूर
- अगुवानी-सोनेपूर
- एकाच दशकात ५+ मेगा ब्रिज प्रकल्प

### एअर कनेक्टिव्हिटी

- दरभंगा एअरपोर्ट २० लाख प्रवासी क्षमता

### पटना नवीन टर्मिनल




- गया आंतरराष्ट्रीय विमानतळ विस्तार



### रेल्वे विकास

- १७७ किमी डबल लाइन
- स्टेशन्सचे आधुनिकीकरण
- पूर्ण इलेक्ट्रिफिकेशन

### ग्रामीण बिहारचा बदल

- ५५,००० किमी ग्रामीण रस्ते
- १.३८ कोटी घरांना नळाचे पाणी
- १००% ग्रामीण विद्युतीकरण

हा बदल संख्यांचा नाही बिहारच्या आत्मविश्वासाचा बदल आहे. हा बिहार २०१४ चा नाही हा नवा, सक्षम, आत्मनिर्भर आणि वेगाने धावणारा बिहार आहे. ■








बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी आणि मित्र पक्षांचा दणदणीत विजय झाल्याबद्दल प्रदेश कार्यालयात विजयोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, आ. कुमार आयलानी, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, अमरजीत मिश्र, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह आदी.






# जनजातींच्या योगदानाचा गौरव

**● शिवप्रकाश, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री**

> देशाच्या स्वातंत्र्य संग्रामात जंगलांमध्ये, दऱ्या-खोऱ्यांमध्ये दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी तथा जनजातींचे मोठे योगदान आहे. या योगदानाची माहिती बहुतांश भारतीयांना नाही. जनजातींच्या स्वातंत्र्य संग्रामातील योगदानाचा गौरव करण्यासाठी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने १५ नोव्हेंबर रोजी जनजातीतील योद्धे भगवान बिरसा मुंडा यांचा जन्मदिन जनजाती गौरव दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. मोदी सरकारचा हा निर्णय अत्यंत योग्य आहे.

**देशाच्या** स्वातंत्र्यासाठी आदिवासी समाजातील अनेक विरांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. या सर्व विरांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आणि त्यांनी स्वातंत्र्यासाठी दिलेल्या लढ्याचे स्मरण करण्यासाठी जनजाती गौरव दिन साजरा करण्याचे मोदी सरकारने ठरविले आहे. स्वातंत्र्य लढ्यात मोठे योगदान दिले असले तरी इतिहासकार आणि राज्यकर्त्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यामुळे या योगदानाची माहिती संपूर्ण भारताला करून देणे गरजेचे होते. २०११ च्या जनगणेनुसार देशात जनजातींची लोकसंख्या सुमारे १०.५० कोटी एवढी होती. देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ८ टक्के असलेल्या आदिवासी समाजात विविध परंपरांमुळे अनेक पोटजाती आहेत. देशात जनजातींचे अंदाजे ७००च्या वर समूह असावेत. यातील ७५ समूह असे आहेत की, ते अजूनही देशाच्या



मुख्य प्रवाहात सामील होऊ शकलेले नाही. जनजातींनी हस्त कला, परंपरागत काष्ठ कला याच्या माध्यमातून देशाच्या आर्थिक प्रगतीत लक्षणीय योगदान दिले आहे. क्रीडा क्षेत्रातही जनजातीतील खेळाडूंचा मोठा लौकीक आहे. सहावेळा मुष्टीयुद्धाचे जागतिक विजेतेपद मिळवणारी मेरी कोम, तिरंदाजीमधील निष्णात लिंबाराम कोमलीका बारी, हॉकीपटू दिलीप तिर्की यासारख्या जनजातीतील खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रावर आपला ठसा उमटवला आहे.

पुरातन काळापासून जनजाती समाज हा हिंदू धर्माचा अविभाज्य भाग आहे. निसर्गाची उपासणा करणाऱ्या जनजातींनी स्वत:ला हिंदू धर्मापासून कधीच वेगळे समजले नाही. हिंदू धर्मात प्राचीन काळापासून वृक्ष, पाणी आणि निसर्गाची पूजा करणाऱ्या अनेक परंपरा आहेत. वेगवेगळ्या निमित्ताने निसर्गाचे घटक असलेल्या झाडांची, नद्यांची आणि समुद्राची पूजा केली जाते. देशातील अनेक जनजाती प्रभू श्रीरामचंद्राचे आपण वारस असल्याचे समजतात. काही जनजाती 'कौसल्या माते'शी आपली नाळ जोडली असल्याचे समजातात. उत्तर पूर्वांचलमध्ये भगवान श्रीकृष्ण आणि रुक्मिणीला अनेक जनजाती दैवत मानतात. भगवान श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी ही मणिपूरची होती, असा

तेथील जनजातींचा समज आहे. उत्तराखंड, उत्तर प्रदेश आणि नेपाळमधील तराई भागातील थारू जनजाती ही महाराणा प्रताप यांचे वंशज असल्याचे मानते. थारू जनजातीतील प्रत्येक कुटुंबाच्या घरात हळदी घाटाची माती देवघरात ठेवलेली आढळते. अर्वाचीन भारतीय परंपरेचा भाग असलेल्या जनजातींनी इंग्रजांविरुद्ध कडवा लढा दिला. झारंखडमधील खुंटी जिल्ह्यातील भगवान बिरसा मुंडा हे जनजातीतील स्वातंत्र्यविरांचे अग्रणी आहेत. १३ ऑक्टोबर १८९४ रोजी बिरसा मुंडा यांनी इंग्रजांनी लादलेल्या कराविरोधात (लगान) आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे बिरसा मुंडा यांना हजारीबाग येथील तुरुंगात २ वर्षे कारावासात ठेवण्यात आले होते. त्यावेळी पडलेल्या दुष्काळात जनतेला मदत केल्यामुळे बिरसा मुंडा हे धरतीबाबा म्हणून ओळखले जाऊ लागले. अनेक दुष्काळ पिडीतांना मदत केल्यामुळे त्यांना आदिवासी समाज देवाप्रमाणे मानू लागल्याने त्यांना भगवान ही उपाधी मिळाली. बिरसा मुंडा यांच्याबरोबर तिलका मांझी, ताना भगत, सुरेंद्र सहाय, अल्लुरी सीताराम राजू, नागाराणी यांनीही इंग्रजांविरोधातील लढ्यात मोठे योगदान दिले आहे. १८५५ मध्ये झालेले संथाल बंड, आसाममधील खासी बंड, फुकन आणि बरुआ समाजाने केलेले बंड, बंगालमधील भुटीया लेप्चा जनजातींनी केलेले बंड यांचा देशाला स्वतंत्र करण्यामध्ये मोठा वाटा होता. जनजातींनी केलेल्या विविध राज्यांतील या बंडांमुळे इंग्रजांचे साम्राज्य हादरले. जनजाती समाजातील सनातन परंपरा, धर्म भक्ती आणि स्वातंत्र्य लढ्यात दाखवलेले शौर्य पाहून ब्रिटीश सरकार हादरले होते. त्यामुळेच ब्रिटीशांनी या लढवय्या आणि धर्मप्रिय, देशभक्त समाजाला उर्वरीत हिंदू समाजापासून तोडण्याचा कट रचला. १८ व्या शतकामध्ये आदिवासी समाजात फूट पाडण्याच्या हालचाली ब्रिटीशांनी सुरू केल्या. याचा एक भाग म्हणून इंग्लंडमधील मिशनरी मंडळींनी जनजातीचा प्रभाव असलेल्या भागामध्ये पाय पसरण्यास सुरुवात केली. या समाजातील निरक्षतेचा फायदा उठवत हिंदू धर्मापासून जनजातींना तोडण्यासाठी मिशनरी मंडळींनी अनेक उद्योग केले. जनजातींच्या मनात हिंदू धर्मियांबद्दल संताप निर्माण व्हावा, यासाठी हिंदू धर्माबद्दल, प्रथा– परंपरांबद्दल खोटे–नाटे पसरवण्यास सुरुवात केली. तुम्हाला हिंदू धर्मियातील उच्चवर्णीय अस्पृश्य समजतात, हीन समजतात अशा आशयाचा समज मिशनरींनी जनजातींच्या मनात निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जनजातींमध्ये हिंदू धर्मियांबद्दल भीती निर्माण करून त्यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारावा यासाठी षड्यंत्र आखले गेले. जनजातींच्या मनात विश्वास निर्माण करण्यासाठी आदिवासी बहुल भागात शिक्षण, आरोग्य, पाणी यासारख्या सेवा पुरवण्याचे काम मिशनरी मंडळींनी हाती घेतले. ज्येष्ठ पत्रकार अरुण शौरी यांनी, 'भारतातील ख्रिश्चन धर्म प्रसाराचे तंत्र', या पुस्तकात मिशनऱ्यांनी जनजातींना कशी प्रलोभने दाखवली, याबाबतची उदाहरणे देण्यात आली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मिशनऱ्यांच्या अभियानाला डाव्या संघटना, स्वयंघोषित पुरोगामी लेखक, पत्रकार मंडळींनी पाठिंबा दिला. अजूनही आदिवासीची मोठी लोकसंख्या असलेल्या भागात मिशनरी मंडळी धर्मांतरासाठी प्रयत्न करताना आढळतात. युरोपातील आक्रमणकारांनी अनेक देश काबिज केले होते. हे आक्रमणकारी ज्या–ज्या देशात गेले तेथे त्यांनी मूलनिवासींवर अत्याचार केले. त्यामुळे हे मूलनिवासी जंगलामध्ये जाऊन स्थायिक झाले. या कारणांमुळे त्यांना आदिवासी असे संबोधले जाऊ लागले. भारतात बाहेरून आलेले जाती समूह कोणच नव्हते. भारतातील सर्वच नागरिक येथील मूलनिवासी आहेत. जंगलांमध्ये, दुर्गम भागातील डोंगर रांगांमध्ये राहणाऱ्या जनजातींनी भारताच्या सांस्कृतिक इतिहासात अनोखे स्थान निर्माण केले आहे. या जनजातींच्या सन्मानासाठी बिरसा मुंडा यांच्या जन्मदिनाची निवड करणे अत्यंत उचित आहे. या निर्णयाबद्दल मोदी सरकारला धन्यवाद. या दिनाच्या निमित्ताने विभाजनकारी शक्तींचा बिमोड करण्याची शपथ घेऊ. ■



# ‘वंदे मातरम्’ - सांस्कृतिक राष्ट्रवादाची पहिली घोषणा




● **अमित शहा,** केंद्रीय गृहमंत्री

> आपल्या राष्ट्राच्या इतिहासाच्या या प्रदीर्घ आणि प्रेरणादायी वाटचालीत, असे अनेक निर्णायक क्षण येऊन गेले आहेत, जेव्हा गीते आणि कला या चळवळीचा आत्मा बनल्या होत्या, त्यांनी त्या त्या वेळच्या सामूहिक भावनांना कृतिशील आयाम मिळवून दिला होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्याची युद्धगीते असोत, वा स्वातंत्र्य लढ्यात गायली गेलेली देशभक्तिपर गीते, अथवा आणीबाणीच्या काळात युवा वर्गाने गायलेली विद्रोही गीते असोत, अशा असंख्य गीतांनी भारतीय समाजात कायमच सामूहिक चेतना आणि एकतेची भावना जागृत केली आहे.

**अशा** या सर्व गीतांमध्ये सर्वात ठळकपणे उठून दिसणारे गीत म्हणजे, भारताचे राष्ट्रगान ‘वंदे मातरम्’ या गीताच्या उदयामागची गाथा ही काही कोणत्याही युद्धभूमीवरून सुरू झाली नव्हती, तर ती बंकिमचंद्र चट्टोपाध्याय या एका विद्वान व्यक्तीच्या शांत पण दृढनिश्चयी मनातून जन्माला आली होती. १८७५ साली, जगद्धात्री पूजेच्या (कार्तिक शुक्ल नवमी किंवा अक्षय नवमी) शुभदिनी, त्यांनी एका प्रार्थना गीताची रचना केली. हेच गीत नंतर देशाच्या स्वातंत्र्याचे चिरकालासाठीचे राष्ट्रगान बनले. या गीताच्या त्या पवित्र ओळींमागे प्रेरणा होती, ती भारताच्या खोलवर रुजलेल्या नागरी संस्कृतीच्या मुळांची, अथर्ववेदातील ‘माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः’ (पृथ्वी माझी माता आहे आणि मी तिचा पुत्र आहे) या आवाहनापासून ते देवी महात्म्यातील ईश्वरासमान मातेच्या आवाहनाची.

‘वंदे मातरम्’ हे केवळ एक राष्ट्रीय गीत किंवा स्वातंत्र्य चळवळीचे जीवनरक्त नव्हते. तर हे गीत बंकिमचंद्र यांनी सांस्कृतिक राष्ट्रवादाची केलेली पहिली घोषणाही होती. या गीतानेच आपल्याला,




प्राप्त झाले. पाहता पाहता या गीताने भाषा आणि प्रदेशांच्या सीमा ओलांडल्या आणि संपूर्ण भारतात त्याचा प्रतिध्वनी घुमू लागला. तमिळनाडूमध्ये सुब्रमण्यम भारती यांनी ते तमिळ भाषेत आणले, तर पंजाबमध्ये क्रांतिकारकांनी ब्रिटिश राजवटीचा प्रतिकार करण्यासाठी ते गायले. वर्ष १९०५ मध्ये बंगालच्या फाळणीच्या वेळी, जेव्हा संपूर्ण प्रांतात बंडखोरीचे वातावरण होते, तेव्हा ब्रिटिशांनी, 'वंदे मातरम्'च्या सार्वजनिक उद्घोषावर बंदी घातली.

भारत हा केवळ भौगोलिक प्रदेश नाही, तर भारत म्हणजे एक भू सांस्कृतिक नागरी संस्कृती आहे, आणि ती नकाशावरील रेषांनी नाही, तर परस्पर सामायिक संस्कृती, स्मृती, त्याग, शौर्य आणि मातृत्वाच्या भावनेने एकसंध बांधली गेलेली आहे, ही केवळ भूमी नाही, तर ते भक्ती आणि कर्तव्य भानवेच्या मूल्यांनी पवित्र झालेले तीर्थक्षेत्र आहे, याचे स्मरण करून दिले.

महर्षी अरविंद यांनी वर्णन केल्याप्रमाणे, बंकिम हे आधुनिक भारताचे द्रष्टे नेतेच होते, त्यांनी आपल्या शब्दांमधून या राष्ट्राच्या आत्म्याला पुन्हा जागृत केले. आनंदमठ ही त्यांची साहित्यकृती म्हणजे केवळ एक कादंबरी नव्हती, तर तो गद्य स्वरूपातला मंत्रच होता. या मंत्रानेच एका निद्रिस्त अवस्थेत गेलेल्या आपल्या राष्ट्राला, स्वतःच्या दैवी शक्तीचा पुन्हा शोध घेण्यासाठी प्रेरित केले होते. आपल्या एका पत्रात बंकिम बाबू यांनी लिहिलेच आहे, माझी सर्व कामे गंगा नदीत विसर्जित झाली तरी त्याला माझी कोणतीही हरकत नाही, पण हे प्रार्थना गीत मात्र चिरंतन जिवंत राहील. हे एक महान गीत ठरेल आणि ते लोकांची हृदये जिंकेल. त्यांचे हे शब्द खरोखरच भविष्यवेधी होते. वसाहतवादी राजवटीच्या सर्वात अंधकारमय काळात त्यांनी लिहिलेले 'वंदे मातरम्' हे गीत जागृतीचे प्रभातगीतच बनले.

१८९६ मध्ये, रवींद्रनाथ टागोर यांनी 'वंदे मातरम्'ला चाल लावली आणि कलकत्ता (आत्ताचे कोलकाता) येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनात त्यांनी ते गायलेही, आणि या प्रार्थना गीताला स्वतःची अभिव्यक्ती आणि अमरत्व

तरीही, १४ एप्रिल १९०६ रोजी, बारीसालमध्ये हजारोंनी हा आदेश धुडकावून लावला. जेव्हा पोलिसांनी शांततामय जमावावर हल्ला केला तेव्हा पुरुष आणि स्त्रिया अशा सर्वांनीच रक्ताळलेल्या अवस्थेत रस्त्यावर उभे राहून एका आवाजात 'वंदे मातरम्'च्या घोषणा दिल्या. येथूनच, हा पवित्र मंत्र गदर पार्टीच्या क्रांतिकारकांबरोबर कॅलिफोर्नियात पोहोचला. नेताजींच्या सैनिकांनी सिंगापूरहून कूच केले तेव्हा आझाद हिंद फौजेच्या तुकड्यांमध्ये हा मंत्र प्रतिध्वनित झाला. शाही भारतीय नौदलाने १९४६ मध्ये केलेल्या बंडाच्या वेळी जेव्हा भारतीय नाविकांनी ब्रिटिशांच्या युद्धनौकांवर तिरंगा फडकवला तेव्हादेखील तो आसमंतात दुमदुमला. खुदिराम बोस यांच्यापासून अश्फाकुल्ला खान यांच्यापर्यंत, चंद्रशेखर आझाद यांच्यापासून तिरुप्पूर कुमारन यांच्यापर्यंत ही घोषणा एकसारखी घुमली. हे केवळ एक गीत राहिले नव्हते; तर तो भारताच्या आत्म्याचा एक सामूहिक आवाज बनला होता. महात्मा गांधीजींनी स्वतःच कबूल केले आहे की 'वंदे मातरम्' या गीतामध्ये सर्वात निष्क्रिय रक्तातदेखील चेतना निर्माण करण्याची जादूई ताकद होती. या गीताने उदारमतवादी आणि क्रांतिकारी, विचारवंत आणि सैनिक अशा सर्वांनाच एकसमान पद्धतीने एकत्र आणले. महर्षी अरविंद यांनी घोषित केल्यानुसार, हे गीत म्हणजे भारताच्या पुनर्जन्माचा मंत्र ठरले. दिनांक २६ ऑक्टोबर रोजी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या मन की बात' या कार्यक्रमादरम्यान 'वंदे मातरम्' या गीताच्या वैभवशाली वारशाची देशाला आठवण करून दिली. ■

# घर-घर स्वदेशी

● शिवप्रकाश, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री

गेल्या काही महिन्यांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय नागरिकांना स्वदेशी वस्तू वापरण्याचे आवाहन विविध माध्यमांतून सातत्याने केले आहे. पंतप्रधान मोदी हे फक्त स्वदेशी वापरण्याचे आवाहन करून थांबले नाहीत तर केंद्र सरकारच्या माध्यमातून पंतप्रधानांनी स्वदेशी वस्तू खरेदीला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक निर्णयही घेतले आहेत.

**स्वदेशी** वस्तू वापरण्यासाठी आणि त्याद्वारे देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी भारतीय जनता पक्षाने अलिकडेच 'हर–घर स्वदेशी, घर–घर स्वदेशी' हे अभियान सुरू केले आहे, केंद्र सरकारच्या जीएसटी दरकपातीनंतर 'बचत महोत्सव' सुरू झाला. या बचत महोत्सवात भारतीयांनी पंतप्रधान मोदी यांच्या स्वदेशी वस्तू खरेदी करण्याच्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद दिला. दसरा आणि दिवाळीमध्ये झालेल्या 'महाखरेदी उत्सवात' एकूण खरेदीपैकी ८७ टक्के वस्तू भारतात तयार झालेल्या होत्या. यावरून नागरिकांनी 'हर–घर स्वदेशी'चे अभियान सर्वार्थाने यशस्वी ठरवल्याचे दिसते आहे. पंतप्रधान मोदी यांनी २०१४ मध्ये सत्तेवर आल्यापासूनच भारतीयांनी विदेशी वस्तूंवरील अवलंबित्व कमी करण्याचे आवाहन केले होते. भारतात





वस्तू उत्पादन करा आणि या वस्तू जगभर विकल्या जातील, अशा दर्जाच्या तयार करा, असा कानमंत्र पंतप्रधानांनी उत्पादक आणि उद्योग क्षेत्राला दिला होता. 'मेक इन इंडिया' हे मोदी सरकारचे अभियान देशाला आत्मनिर्भर बनविण्याच्या प्रयत्नांचा पहिला टप्पा होता. २०२० मध्ये कोरोना संकटात पंतप्रधान मोदी यांनी भारतातील उद्योगांना मदतीचा हात देताना स्वदेशी वस्तूंच्या वापरासाठी, स्वदेशी वस्तूंच्या प्रचारासाठी कार्यरत व्हा, असे आवाहन केले होते. कोरोना संकटातून निर्माण झालेल्या आर्थिक पेचप्रसंगातून उद्योग क्षेत्राला बाहेर काढण्यासाठी मोदी सरकारने आत्मनिर्भर भारत पॅकेज जाहीर केले होते. कोरोना काळात संपूर्ण जगाचे अर्थचक्र ठप्प झाले होते. अशा संकटात जागतिक स्थितीचा भारतीय उद्योगांवर विपरीत परिणाम होणार, हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ होते. अशा स्थितीत भारतीय उद्योगांना मदत करणे आवश्यकच होते. मात्र भारतीय उद्योग क्षेत्राला फक्त सरकारी पॅकेज देऊ करणे पुरेसे ठरणार नाही, याची जाणीव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना असल्यामुळे त्यांनी त्यावेळी 'व्होकल फॉर लोकल'चा आग्रह धरणे सुरू केले. भारतात बनवल्या गेलेल्या वस्तू म्हणजे स्वदेशी अशी सुटसुटीत व्याख्या करीत मोदी सरकारने विदेशी कंपन्यांनी भारतात उत्पादन करणे सुरू करावे, असा आग्रह

धरला. मोदी सरकारच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला हळूहळू यश येताना दिसत आहे.

गणेशोत्सवापासून दिवाळीपर्यंत देशभर सणांचा हंगाम असतो. गणेशोत्सवाबरोबरच विजयादशमी, दीपावली, छठपूजा यासारखे सण ऑगस्ट-सप्टेंबर ते ऑक्टोबर-नोव्हेंबर या काळात देशभर साजरे होतात. दिवाळी पाडव्यात अनेक राज्यात नववर्ष प्रारंभ होते. मुस्लिम धर्मियांचा ईद सण याच काळात साजरा होतो. हे सर्व उत्सव सर्वधर्मीय नागरीक प्रचंड उत्साहात साजरे करतात. या काळात अनेक वर्षांपासून चालत आलेल्या वेगवेगळ्या धार्मिक आणि सामाजिक परंपरा, प्रथांचे पालन केले जाते. या काळात मिठाया, गोड पदार्थ यांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. सण उत्साहात साजरा करण्यासाठी नव्या कपड्यांची खरेदी होते, घरांवर दिव्यांची आरास केली जाते. एकूणच या सणासुदीच्या दिवसांमध्ये देशाचे अर्थचक्र गतिमान होते. भारतीयांची ही मानसिकता लक्षात घेऊनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घरांची सजावट करताना स्वदेशी वस्तूंचाच वापर करा, कपडे खरेदीतही भारतात बनविलेल्या गेलेल्या कपड्यांचीच खरेदी करा, भेटवस्तू देतानाही भारतात बनविल्या गेलेल्या वस्तूंचीच खरेदी करा आणि आपल्या देशातील उत्पादक बांधवांना प्रोत्साहन द्या, असे आवाहन 'मन की बात'सारख्या कार्यक्रमातून केले होते. भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत बारा बलुतेदारांचे म्हणजे कारागिरांचे महत्वाचे स्थान आहे. अलिकडच्या काळात विदेशी वस्तूंच्या वापरामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था कमकुवत झाली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था पुन्हा भक्कम करण्यासाठी बारा बलुतेदारांनी बनविलेल्या वस्तूंना खरेदी करताना प्राधान्य मिळावे, अशी पंतप्रधानांची दृष्टी आहे. विदेशी कंपन्यांनी त्यांची तयार उत्पादने भारतात आणून विकण्याऐवजी भारतात त्या वस्तूंचे उत्पादन करावे. ज्यामुळे भारतातील रोजगार वाढेल, असा दृष्टीकोन मोदी सरकारने सातत्याने ठेवला आहे. त्यामुळेच विदेशीतील नामवंत मोबाईल कंपन्यांनी भारतात उत्पादन सुरू केले आहे. मोदी सरकारच्या धोरणामुळे भारत हा मोबाईलची मोठ्या प्रमाणात निर्यात करणारा देश बनला आहे. भारतात झालेल्या गुंतवणुकीचा मालक कोणीही असो, मात्र त्या गुंतवणुकीतून होणाऱ्या उत्पादनात भारतीय कामगारांच्या श्रमाचा, बुद्धीचा वाटा असला पाहिजे. असा वाटा असलेले विदेशी गुंतवणूकदारांचे उत्पादनही स्वदेशीच



असेल, असे पंतप्रधानांनी एका कार्यक्रमात स्पष्टपणे सांगितले होते. पंतप्रधान मोदी यांचे स्वदेशी वस्तू वापरण्याबाबतचे आवाहन केवळ भावनिक नव्हते तर यामागे देशाला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनविण्याची दूरदृष्टी आहे. स्वदेशी वस्तूंचा वापर वाढला तर देशातील आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या वर्गाचा विकास होईल, हे ठाऊक असल्याने पंतप्रधानांनी 'गर्व से कहो यह स्वदेशी है' ची हाक दिली आहे. नवरात्र आणि दिवाळी या काळात मोठी विक्री झालेल्या वस्तू पाहिल्यावर असे लक्षात येईल की या वस्तू देशातील वंचित आणि कष्टकरी वर्गाने बनविलेल्या आहेत. दिवाळीतील पणत्या, आकाशकंदिल, खादी आणि हातमाग उत्पादने, मेणबत्त्या, फटाके, खेळणी ही उत्पादने कुंभार, प्रजापती यासारख्या कष्टकरी वर्गाने बनविली आहेत. छोट्या-छोट्या कलाकारांनी, कारागिरांनी, जनजाती समाजातील कारागिरांनी बनिवलेल्या वस्तूंची यावर्षीच्या सणासुदीच्या काळात मोठी विक्री झाली. पणत्या, आकाशकंदिल, फटाके, खेळणी यासारखी उत्पादनेही विदेशातील कंपन्या बनवू लागल्या आहेत. गेल्या काही वर्षात विदेशी कंपन्यांच्या या उत्पादनांची भारतात प्रचंड विक्री होऊ लागल्यामुळे देशातील गोरगरीब कारागीर, बारा बलुतेदार यांची आर्थिक स्थिती बिकट बनली होती. स्वदेशीच्या आवाहनामुळे समाजातील हा कष्टकरी वर्ग पुन्हा अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात येणार आहे.

पं.दीनदयाल उपाध्याय यांनी आपल्या अंत्योदयाच्या संकल्पनेत समाजातील वंचित आणि कष्टकऱ्यांच्या आर्थिक विकासाचा विचार मांडला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वदेशीच्या आवाहनामागे हाच विचार आहे. यातूनच आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट साध्य होणार आहे. ■

# राज ठाकरे यांनाही हवा व्होट जिहाद

● **ॲड. आशिष शेलार**, सांस्कृतिक कार्य मंत्री

> राज ठाकरे यांना दुबार मतदार असलेले हिंदू आणि मराठी माणसे दिसतात. मात्र अनेक मतदारसंघातील दुबार नावे असलेले मुस्लीम दिसत नाहीत. राज ठाकरे यांनाही व्होट जिहादचे दुखणे जडले आहे.




**भाजपा** कधीच मतदारांमध्ये भेद करत नाही मात्र मविआ आणि आता नवा भिडू राज ठाकरे हे जाती, धर्म, समाजांमध्ये भेदभाव करत असून त्यांना आम्ही उघडे पाडणार आहोत. राज ठाकरे यांनी कल्याण ग्रामीण, डोंबिवली, मुरबाड, भिवंडी मतदारसंघांचा उल्लेख करत प्रभाकर पाटील, राम भोईर, गजानन भोईर या दुबार मराठी मतदारांची नावे घेऊन दुबार मतदानावर टीका केली होती. पूर्वी बिहारी, मग उत्तर भारतीय मतदार, मग जैन मतदार, मग हिंदी भाषिक मग गुजराती आता भोईर पाटील? हिंदू, मराठी आणि दलित यांच्याविरोधात तुम्ही भूमिका घेणार का? निवडणूक लढविण्याच्या प्रचलित कायदेशीर पद्धतीचा राज ठाकरे यांना विसर पडलेला आहे. राज ठाकरेंनी फक्त हिंदू, मराठी दुबार मतदारांचा उल्लेख केला त्यांना मुस्लिम दुबार मतदार दिसले नाहीत. मतदार यादीमधील चुकांवर मविआचा आक्षेप असेल तर त्यांनी मतदारयाद्यांच्या सखोल पडताळणी मोहीमेला पाठिंबा द्यावा. अनेक आमदारांच्या मतदारसंघांतील मुस्लीम दुबार मतदारांची संख्या आणि मविआ आमदारांचे मताधिक्य याची तुलना केली तर अनेक मविआ आमदारांचा विजय या मुस्लीम दुबार मतदारांमुळेच झाला असे म्हणायचे का? भाजपाची भूमिका ही नेहमीच 'सर्वांना न्याय, पण कुणाचेही तुष्टीकरण नाही' अशी आहे. जे कोणी दुबार मतदार दिसतील त्यांना फोडून टाकण्याची भाषा करताना पुन्हा मराठी माणसालाच बडवणार का?

महाविकास आघाडीच्या सत्याच्या मोर्चामध्ये निव्वळ असत्यकथन करून सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करण्यात आली. विधानसभा निवडणुकीनंतर विरोधकांना 'जोर का झटका' लागल्याने दिल्लीतील पप्पू ते गल्लीतील पप्पूपर्यंत सर्वांनी मतचोरीच्या फेक नरेटिव्हची बांधणी करत रान उठवण्यास सुरुवात केली. त्याचाच पुढचा अंक आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तोंडावर विरोधक खोट्या माहितीच्या आधारे रंगवण्याचा प्रयत्न करत आहेत. मतचोरीचा खोटा गळा काढून मविआने केलेला खरा घोटाळा दाबला जात आहे. उद्धव ठाकरे असो किंवा कोणीही मतदार असो तो अवैधरित्या गळता कामा नये अशीच आमची भूमिका आहे. निवडणूक आयोग आणि निवडणुकीची मतदार यादी याच्या आडून आमच्यावर हल्ला केला, तर आम्ही प्रतिहल्लाच करणार.

मविआच्या गडबडीची उदाहरणे दाखवाच या मविआच्या

**मतदार याद्यांमधील चुका शोधून काढताना दुबार नावांचा उल्लेख राज ठाकरे यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला आहे. त्यात मुस्लिम धर्मीयांतील दुबार मतदारांची नावे राज, उद्धव ठाकरे यांनी घेतली नाहीत. ज्या ठिकाणी मुस्लिम धर्मीय दुबार मतदारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, तेथे मविआ उमेदवारांचा विजय झाला आहे.**

मोर्चामध्ये उद्धव ठाकरे यांनी दिलेल्या आव्हानानंतर आम्ही निवडणूक आयोगाच्या वतीने उत्तर देत नाही आणि कदापि देणार नाही मात्र उघड्या डोळ्यांनी दिसणारे वास्तव समोर मांडत आहोत. लोकसभा निवडणुकीत मविआने सुनियोजित 'व्होट जिहाद' करत अनेक प्रामाणिक मतदारांची नावे वगळली होती. देश, देशातील यंत्रणा, देशाच्या सुरक्षेशी खेळ केला होता.

### कर्जत-जामखेड, लातूर, माळशिरस, धारावी, मुंबादेवी आदी ३१ मतदारसंघांत दुबार मुस्लीम मतदार

३१ विधानसभा मतदारसंघाच्या विश्लेषणानंतर २ लाख २५ हजार ७९१ मुस्लिम आणि ख्रिश्चन दुबार मतदारांची संख्या समोर आली असून सर्व २८८ मदारसंघातील हाच आकडा १६ लाख ८४ हजार २५६ वर जाऊ शकेल. ह्या आकड्यात मविआच्या समर्थकांचा समावेश नाही. मविआ नेते ही नावे का घेत नाहीत असा प्रश्न आहे. रोहित पवारांच्या कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघात: मुस्लिम दुबार मतदार ५५३२ (१२४३ मतांनी विजय): नाना पटोलेंच्या साकोली विधानसभा मतदारसंघात: मुस्लीमांची दुबार मते ४७७ (२०८ मतांनी विजय), वरुण सरदेसाईंच्या वांद्रे पूर्व विधानसभा मतदारसंघात: १३,३१३ हे मुस्लिम आणि ख्रिश्चन दुबार मतदार (११ हजार ३६५ मतांनी विजय), बीड मतदारसंघात संदीप क्षीरसागर ५३२४ मतांनी विजयी झाले, तिथे १४ हजार ९४४ दुबार मुस्लिम मते आहेत. जितेंद्र आव्हाडांच्या मुंब्रा विधानसभा मतदारसंघात: दुबार मुस्लिम मते ३० हजार ६०१ उत्तम जानकरांच्या माळशिरस विधानसभा मतदारसंघात: दुबार मुस्लिम मते ४३९९ राजेश टोपेंच्या घनसावंगी विधानसभा मतदारसंघात: दुबार मुस्लिम मते ११,७५. (केवळ २३०९ मतांनी शिवसेना विजयी) अमित देशमुखांच्या लातूर शहर मतदारसंघात:



**■ लोकसभेत महाविकास आघाडीची मते २ कोटी ५० लाख १५ हजार ८१९**

**■ लोकसभेत महायुतीला मिळालेली मते २ कोटी ४८ लाख १२ हजार ६२७**

**■ हे अंतर होते फक्त २ लाख ३ हजार आणि १९२.**

**■ आता पुढचा विषय. आम्ही केवळ ३१ विधानसभा मतदारसंघाचे विश्लेषण केले. लक्षात घ्या, हे २८८ पैकी केवळ ३१ मतदारसंघाचे विश्लेषण आहे. यात केवळ मुस्लिम आणि ख्रिश्चन अशा दुबार मतदारांची संख्या आहे,२ लाख २५ हजार ७९१.**

**■ संपूर्ण २८८ मतदारसंघांवरही काम सुरु आहे. ते अंतिम झाल्यावर सांगूच. पण, ती संख्या आहे, १६ लाख ८४ हजार २५६**

**■ पुन्हा लक्षात घ्या, ही केवळ मुस्लिम आणि ख्रिश्चन मतदारांची दुबार संख्या. यात महाविकास आघाडीचे समर्थक नाहीत. ती आणखी कितीतरी मोठी असू शकते.**

**■ आता आम्हाला प्रश्न आहे, महाविकास आघाडी किंवा मनसे फक्त मराठी माणसांची नावे का घेते? ही नावे का घेत नाही?**

## बुरख्याआड महाविकास आघाडीचे काय काय खेळ चालले आहेत, याचा विचार राज ठाकरे, हिंदुत्व सोडलेले उद्धव ठाकरे यांनी करावा

मी ८ वर्गवारीत सादरीकरण करतो.

**वर्गवारी १**

नाव एकसारखे आणि मतदारयादीत नंबर वेगळे

**वर्गवारी २**

नाव एकसारखे आणि पत्ते वेगवेगळे

**वर्गवारी ३**

नाव एकसारखे आणि मतदार ओळखपत्र वेगवेगळे

**वर्गवारी ४**

नाव एकसारखे, पण, नावात अदलाबदल

**वर्गवारी ५**

नाव एकसारखे पण, फोटोत अदलाबदल

**वर्गवारी ६**

नाव एकसारखे पण, लिंगबदल

**वर्गवारी ७**

एकाच व्यक्तीची नावे ३ वेळा

**वर्गवारी ८**


एकाच व्यक्तीची नावे ६ वेळा

बांद्रे पूर्व : मुमताज बानो अन्सारी दोन ठिकाणे नावे. अनुक्रमांक १०१२ आणि ४३७ विधानसभा झाल्यावर हे नाव डिलिट झाले. मग आता याचे सर्व्हर मातोश्रीत आहे का?

**या मतचोरीवर कुणी बोलेल काय?**

की त्यावर पांघरुण टाकण्यासाठी हा नवा खेळ खेळला जातोय?

छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात बुरख्याआडून खेळू नका, असेच आमचे सांगणे आहे.




२० हजार ६१३ दुबार मुस्लिम मते ज्योती गायकवाडांच्या धारावीमध्ये: १० हजार ६८९ दुबार मुस्लिम मते अमीन पटेल यांच्या मुंबादेवीमध्ये: ११ हजार १२६ दुबार मुस्लिम मते नितीन राऊतांच्या उत्तर नागपूरमध्ये: ८३४२ दुबार मुस्लिम मते अस्लम शेख यांच्या मालाड पश्चिममध्ये : १७,००७ दुबार मुस्लिम मते (६२२७ मतांनी विजय). राहुल पाटील यांच्या परभणीमध्ये: १३ हजार ३१३ दुबार मुस्लिम मते सुनील राऊतांच्या विक्रोळीत: ३४५० दुबार मुस्लिम मते. संजय पोतनीसांच्या कलिनामध्ये: ६९७३ दुबार मुस्लिम मते (५००८ मतांनी विजय) अनंत नर यांच्या जोगेश्वरी पूर्वमध्ये: ६४४१ दुबार मुस्लिम मते (१५४१ मतांनी विजय) नितीन देशमुखांच्या बाळापूरमध्ये: ५२५१ दुबार मुस्लिम मतेसुनील प्रभूंच्या दिंडोशीत: ५३४७ दुबार मुस्लिम मते (६१८२ मतांनी विजय) कैलास पाटील यांच्या धाराशिवमध्ये: ११,२४२ दुबार मुस्लिम मते एकच फोटो वापरुन केवळ नावे बदलण्यात आली. असे मोठे घोटाळे महाविकास आघाडीने केले आहेत. कर्जत–जामखेड शबनम शेख: अनुक्रमांक ७४२ मध्ये आणि ७४३ मध्येही. रूबिना शेख : अनुक्रमांक १२६८ मध्ये आणि १२६४ मध्येही साजिद शेख: अनुक्रमांक ३२१ मध्ये आणि ३२३ मध्येही आयशा आतार: अनु. २३५ मध्ये आणि २३६ मध्येही रेयान रईस कुरेशी: अनु. १२८५ मध्ये आणि १३१२ मध्येही. अफसाना पठाण: अनु. ३६० आणि १०५८ मध्येही. वांद्रे पूर्व: मुमताज बानो अन्सारी दोन ठिकाणे नावे. अनुक्रमांक १०१२ आणि ४३७ विधानसभा झाल्यावर हे नाव डिलिट झाले. ■

# राज्य सरकारचा एलॉन मस्क यांच्या 'स्टार लिंक'शी करार




स्टारलिंक सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड (स्टारलिंक) आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागासमवेतच्या सामंजस्य करारामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे. यामुळे राज्यातील दुर्गम आणि अल्पसेवित भागांपर्यंत उपग्रहाधारित इंटरनेट सेवा पोहोचविण्याची दिशा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

**स्टारलिंक** सॅटेलाईट कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड (स्टारलिंक) आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागासमवेत सामंजस्य करारावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव वीरेंद्र सिंग, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. गोविंदराज, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद-सिंघल, उद्योग विभागाचे सचिव पी.अन्बलगन, मुख्यमंत्र्यांचे मुख्य गुंतवणूक व धोरण सल्लागार कौस्तुभ धवसे, स्पेसएक्सच्या मुख्य कार्यकारी अधिकारी लॉरेन ड्रेयर, स्टारलिंक लिमिटेड कंपनीचे प्रतिनिधी मनोज लाडवा, महाआयटीचे महाव्यवस्थापक मकरंद कुरतडीकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य

करारावर स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर आणि महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव विरेंद्र सिंह यांनी स्वाक्षरी केली. यामुळे स्टारलिंकसोबत औपचारिक भागीदारी करणारे महाराष्ट्र भारतातील पहिले राज्य ठरले आहे.

स्टारलिंक महाराष्ट्राशी भागीदारी करत असल्याने आपण राज्यातील शेवटच्या गावापर्यंतची डिजिटल दरी मिटवत आहोत. प्रत्येक शाळा, प्रत्येक आरोग्य केंद्र आणि प्रत्येक गाव आता डिजिटल संपर्कात येणार आहे, कितीही दुर्गम असो ही भागीदारी 'फ्युचर-रेडी' आणि पूर्णपणे जोडलेले महाराष्ट्र घडविण्याच्या आपल्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे. भारतातील पहिले राज्य म्हणून ही भागीदारी सुरू करताना अभिमान वाटत आहे. हे 'डिजिटल इंडिया'च्या ग्रामीण पातळीवरील आदर्श मॉडेल ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

आमचे ध्येय म्हणजे कुठेही, कोणत्याही पार्श्वभूमीतील लोकांना उच्च गतीची इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणे असून महाराष्ट्र शासनासोबत या ऐतिहासिक सहकार्याचा भाग होणे आमच्यासाठी सन्मानाची गोष्ट आहे. स्टारलिंकचे ध्येय म्हणजे पारंपरिक पायाभूत सुविधांपासून वंचित राहिलेल्या लोकांना डिजिटल विश्वात सामील करणे हे आहे. महाराष्ट्राचे समावेशक आणि डिजिटल विकासाचा लवचिक दृष्टीकोन आमच्याशी पूर्णपणे सुसंगत आहे. एकत्र येऊन आपण उपग्रह इंटरनेटद्वारे शिक्षण, आरोग्य सेवा आणि ग्रामीण समुदायांना सक्षम बनविण्याचे उदाहरण निर्माण करु, असे स्टारलिंकच्या उपाध्यक्ष लॉरेन ड्रेयर यांनी सांगितले.

या माध्यमातून शासन संस्था, ग्रामीण समुदाय तसेच महत्त्वाच्या सार्वजनिक पायाभूत सुविधांसाठी उपग्रहाधारित इंटरनेट सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही भागीदारी भारत सरकारकडून मिळणाऱ्या नियामक व कायदेशीर मंजुरींवर आधारित असणार आहे.

या धोरणात्मक भागीदारीअंतर्गत अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने महाराष्ट्र शासन आणि स्टारलिंक मिळून राज्यातील दुर्गम व अल्पसेवित भागांना जोडण्यासाठी कार्य करतील. यात आदिवासी शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आपत्ती नियंत्रण कक्ष, वन चौक्या, किनारी क्षेत्रे, तसेच गडचिरोली, नंदुरबार, धाराशिव आणि वाशिम या जिल्ह्यांचा समावेश आहे.

या उपक्रमाचा उद्देश राज्यातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा मार्गांवरही (जसे की समृद्धी महामार्ग, फेरी सेवा, बंदरे, किनारी पोलीस नेटवर्क) उपग्रहाधारित कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देणे आहे. तसेच शिक्षण आणि टेलिमेडिसिन क्षेत्रातही स्मार्ट कनेक्टिव्हिटीचा लाभ देण्याची योजना आहे.

या उपक्रमासाठी एक संयुक्त कार्यगट स्थापन करण्यात येणार आहे. या कार्यगटाद्वारे ९० दिवसांचा प्रायोगिक टप्पा अंतर्गत तीन टप्प्यांमध्ये ३०, ६० आणि ९० दिवस यानुसार पूर्ण केला जाईल. या प्रगतीचा आढावा दर तिमाहीला मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली घेतला जाणार आहे. महाराष्ट्र-स्टारलिंक सहकार्यामुळे राज्याच्या 'डिजिटल महाराष्ट्र' या प्रमुख मिशनला अधिक गती मिळणार असून, हे उपक्रम राज्यातील ईव्ही, किनारी विकास आणि आपत्ती प्रतिकारशक्ती कार्यक्रमांशी सुसंगतपणे एकत्रित केले जाणार आहे.

### प्रायोगिक टप्प्यातील मुख्य उद्दिष्टे :

- शासन व आदिवासी शाळा, आपले सरकार केंद्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना उपग्रह इंटरनेट जोडणी प्रदान करणे.
- आपत्ती प्रतिसाद आणि किनारी सुरक्षा व्यवस्थेतील संवाद सुधारणा.
- शिक्षण व आरोग्य सेवेसाठी उच्च-गती इंटरनेटद्वारे सुविधा उपलब्ध करून देणे.
- राज्य यंत्रणा आणि स्थानिक समुदायांसाठी प्रशिक्षण व क्षमता-विकास कार्यक्रम राबविणे.
- प्रायोगिक टप्पा पूर्ण झाल्यानंतर हा उपक्रम संपूर्ण राज्यभर विस्तारला जाईल, ज्यामुळे महाराष्ट्र उपग्रहाधारित डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये राष्ट्रीय आघाडीवर पोहोचेल.

### स्टारलिंकविषयी माहिती

स्टारलिंक ही जगातील सर्वाधिक प्रगत लो-अर्थ ऑर्बिट उपग्रहसंस्था आहे, जी विश्वासार्ह आणि उच्च-गतीची ब्रॉडबँड इंटरनेट पुरवते. हे नेटवर्क स्पेसएक्स या कंपनीद्वारे विकसित व संचालित केले जाते. स्पेसएक्स ही जगातील अग्रगण्य लॉन्च सेवा पुरवठादार असून, पुनर्वापर करता येणाऱ्या रॉकेट तंत्रज्ञानाची मालकी असलेली एकमेव कंपनी आहे. ■

# स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनंतर गडचिरोली जिल्ह्यात पहिले महिला व बाल रुग्णालय!

● प्रकाश गाडे

**गडचिरोलीच्या** कधीकाळी नक्षल गड असलेल्या अहेरी या दुर्गम भागात आज इतिहास घडला आहे. जिथं एकेकाळी बंदुकीचा आवाज घुमायचा, तिथं आता नवजात बाळाच्या रडण्याचा आवाज घुमतोय. कारण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नातून अहेरीत पहिलं महिला व बाल रुग्णालय उभं राहिलं आहे आणि तेही पूर्णपणे आधुनिक सुविधांनी सजलेलं. हे रुग्णालय म्हणजे केवळ विट सिमेंटचा प्रकल्प नाही, तर माणुसकीच्या भावनेतून उभं राहिलेलं आरोग्याचं मंदिर आहे. गडचिरोलीसारख्या आदिवासीबहुल, नक्षलप्रभावित जिल्ह्यात वर्षानुवर्षं आरोग्यसेवा ही मोठी समस्या राहिली. गर्भवती महिला किंवा आजारी बालकांना नागपूर, चंद्रपूरपर्यंत प्रवास करावा लागत असे. अनेकांनी या प्रवासात जीव गमावले. पण आज अहेरीच्या मातांना आपल्या गावातच सुरक्षित प्रसूती, नवजात बालकांच्या आरोग्याची काळजी आणि सर्व सुविधा मिळणार आहेत. ही खरी विकासक्रांती आहे. १०० खाटांचं हे अत्याधुनिक हॉस्पिटल ८३ कोटी रुपयांच्या खर्चाने उभं राहिलं आहे. इथे आधुनिक प्रसूती कक्ष,नवजात शिशू निगा केंद्र, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर, सुसज्ज वॉर्ड्स आणि स्वतंत्र आपत्कालीन विभाग उपलब्ध आहेत. हे पाहिलं की लक्षात येतं की, सरकारने केवळ वचन दिलं नाही, तर प्रत्यक्षात सेवा उभी केली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी उद्घाटनावेळी सांगितलं, गडचिरोलीसारख्या भागात शासनाचा हात प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवायचा आहे. आणि खरंच, त्यांचं हे वाक्य या रुग्णालयाच्या भिंतीवर साकार झालंय. या रुग्णालयामुळे गडचिरोलीच्या मातांसाठी आणि बालकांसाठी नव्या जीवनाचा अध्याय सुरू झाला आहे. या मातांना प्रसूतीसाठी २००-३०० किलोमीटर प्रवास करावा लागत होता, त्या आता आपल्या गावातच सुरक्षित वातावरणात प्रसूती करू शकतात. ज्या बाळांना वेळेवर उपचार न मिळाल्याने आयुष्य हरवावं लागायचं,त्यांना आता अहेरीतच डॉक्टरांचा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आधार मिळणार



आहे. हे रुग्णालय केवळ आरोग्याचं केंद्र नाही, तर आत्मविश्वासाचं केंद्र आहे. कारण दुर्गम भागात अशी सुविधा उभी राहणं म्हणजे शासनाने ग्रामीण समाजावर दाखवलेला विश्वास. गडचिरोलीचा चेहराच आता बदलतो आहे. रस्ते, शाळा, पोलिस ठाणी आणि आता आरोग्याचं सशक्त जाळं. हे सर्व शक्य झालंय एका संवेदनशील नेतृत्वामुळे, जे फक्त भाषणात नाही, तर कृतीत माणुसकी दाखवतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नक्षलवाद्यांच्या आत्मसमर्पणातून शांततेचा मार्ग उघडला आणि आता या आरोग्यसेवेच्या माध्यमातून जीवनाचा मार्ग निर्माण केला आहे. एकेकाळी भय आणि बंदुकीच्या सावलीत जगणारा गडचिरोली आज विश्वास आणि विकासाच्या प्रकाशात न्हाऊन निघतोय.

अहेरीतील महिला व बाल रुग्णालय हे केवळ एक इमारत नाही; ते एका नव्या युगाचं दार आहे. मातृत्वाला सन्मान देणारी, नवजात बाळांना सुरक्षा देणारी आणि शासनाला मानवी रूप देणारी ही यशोगाथा आहे. देवेंद्रजींचं हे कार्य सांगतं की, विकास म्हणजे केवळ रस्ते आणि पूल नव्हे, तर माणसाच्या जीवनात नवा विश्वास निर्माण करणं. शेवटी मला एक गोष्ट सांगायची आहे. मला टीका करायची नव्हती विरोधकांवर आणि काँग्रेसवर पण, टीका करणे गरजेचं आहे. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर ७५ वर्षांनंतर गडचिरोली जिल्ह्यात एक आधुनिक महिला व बाल रुग्णालय उभं राहिलं आहे. ७५ वर्षे लागली...देशातील दुर्गम भागात सरकार पोहचण्यासाठी हे काँग्रेसचं पाप आहे! ■

# महाराष्ट्र हे भारताचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल'

## नाविन्यपूर्ण कल्पना असणाऱ्या प्रत्येकाला नवउद्योजक बनण्याची संधी – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**भारतातील** सर्वाधिक नोंदणीकृत स्टार्टअप्स महाराष्ट्रात असून यातील ४५ टक्के स्टार्टअप्स महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत, ही अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्र हे देशाचे खरे 'स्टार्टअप कॅपिटल' असल्याचे सांगून भारताच्या पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या उद्दिष्टात महाराष्ट्राचा आणि त्यातही महिला उद्योजकांचा मोठा वाटा असेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर तरुणांच्या मनातील प्रत्येक कल्पना ही नाविन्यता असून स्टार्टअप्सच्या या काळात प्रत्येक व्यक्तीला नवउद्योजक बनण्याची संधी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जुहू येथील विद्यापीठ परिसरात झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. महिला शिक्षणाचे महत्त्व जाणून महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ सुरू करणाऱ्या भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विद्यापीठामार्फत केंद्रीय शिक्षण मंत्रालय आणि राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सहकाऱ्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे संयुक्त सचिव आर्मस्ट्राँग पामे, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव, 'नॅक'चे अध्यक्ष प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ब्रिटनमध्ये महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता, त्या काळात भारतरत्न महर्षी कर्वे यांनी १९१६ मध्ये महिलांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज आपण महिला सक्षमीकरण आणि नवकल्पनांच्या नव्या युगात प्रवेश केला आहे. राज्य शासनाने नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी धोरण तयार केले आहे. तरुणांच्या स्वप्नांना पंख देण्याची




सरकार आणि विद्यापीठांची भूमिका असून राज्य शासन प्रत्येक टप्प्यावर नवउद्योजकांना साहाय्य करीत आहे.

मुख्यमंत्री म्हणाले, आज नवकल्पनेतून केवळ नवे उत्पादन नव्हे, तर जीवन अधिक सुलभ केले जात आहे. एखादी कल्पना जेव्हा बाजारपेठेत रूपांतरित होते, तेव्हा ती अर्थव्यवस्थेला गती देते. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा नालिटिक्समुळे आता नव्या कल्पनांना वेग मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'स्टार्टअप इंडिया' उपक्रमामुळे आज भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची स्टार्टअप इकॉनॉमी बनला असून लवकरच दुसऱ्या क्रमांकावर पोहोचेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात महिला उद्योजकांनी विकसित केलेल्या नवकल्पनांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी प्रदर्शनाची पाहणी करून सर्व नवोन्मेषकांचे अभिनंदन केले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी वैद्यकीय, कृषी आणि वाहतूक व्यवस्थापन क्षेत्रातील उत्कृष्ट तीन स्टार्टअप कल्पनांचा सत्कार करण्यात आला. तसेच प्री इन्क्युबेशन सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.

कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी राज्यात शिक्षण आणि नाविन्यता क्षेत्रात वेगाने काम होत असल्याचे सांगून येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात प्रथम क्रमांकावर असेल, असा विश्वास व्यक्त केला. शिक्षण आणि नाविन्यता क्षेत्रात महिलांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख करून शासन एसएनडीटी विद्यापीठाच्या पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.उज्वला चक्रदेव यांनी प्रास्ताविकाद्वारे 'इनोव्हेशन महाकुंभ २०२५' बाबत माहिती दिली. ■

# राज्यात रहिवासी क्षेत्रासाठी तुकडेबंदी कायदा रद्द

**राज्यातील** नागरी भागातील तसेच प्रादेशिक योजनांमधील बिगर शेती वापर अनुज्ञेय क्षेत्रावरील जमिनींसाठी तुकडेबंदी कायदा रद्द करण्यात आला आहे. याबाबत राज शासनाने नुकताच एक अध्यादेश जारी केला असून या अध्यादेशामुळे १५ नोव्हेंबर १९६५ पासून तुकडेबंदी कायद्यामुळे अडकलेली घरे आणि प्लॉट कायदेशीर करण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात पत्रकार परिषदेत दिली. या निर्णयासंदर्भात अधिक माहिती देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, या अध्यादेशानुसार दि. १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या अशा तुकड्यांच्या खरेदी-विक्री व्यवहारांना आता कोणतेही शुल्क न आकारता नियमित करण्यात येणार आहे. राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक असून या निर्णयाचा राज्यातील ४९ लाख परिवारांना लाभ होणार आहे.

राज्यात सध्या अंमलात असलेला तुकडेबंदी कायदा हा कृषी क्षेत्रासाठी लागू आहे. या कायद्यानुसार बागायत किंवा जिरायत जमिनींसाठी ठराविक प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. परंतु, वाढत्या नागरीकरणामुळे अनेकांनी शहर व गावांच्या सभोवतालच्या भागात आपल्या गरजेपोटी या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे व्यवहार केले आहेत. अशा व्यवहारांना आतापर्यंत कायदेशीर दर्जा मिळालेला नव्हता. यास्तव राज्य शासनाने ३ नोव्हेंबर २०२५ रोजी तुकडेबंदी कायद्यावरील सुधारित अध्यादेश जारी केला असून त्याची तत्काळ अंमलबजावणी केली जाणार आहे.

हा निर्णय महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या हद्दीतील क्षेत्र, मुंबई, पुणे, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे (एमएमआरडीए, पीएमआरडीए, एनएमआरडीए) ग्रोथ सेंटर्स आणि विशेष नियोजन प्राधिकरणांतील क्षेत्र, तसेच युडीसीपीआरअंतर्गत शहर/गावांच्या परिघातील क्षेत्रांना लागू होणार आहे. ज्या जमिनींचे व्यवहार नोंदणीकृत आहेत पण ७/१२ उताऱ्यावर नावे नोंदलेली नाहीत, त्यांची नावे आता मालकी हक्क म्हणून नोंदवली जातील. तर नोंदणीकृत नसलेले (नोटरीद्वारे केलेले) व्यवहार असलेल्यांनी संबंधित



सब-रजिस्ट्रार कार्यालयात नोंदणी करून आपले हक्क नोंदवता येतील, असेही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले. महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, महसूल विभागामार्फत याबाबत लवकरच सविस्तर कार्यपद्धती तयार करून सर्व विभागीय आणि जिल्हा स्तरावरील कार्यालयांना मार्गदर्शक सूचना देणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लाखो नागरिकांना दिलासा मिळून जमिनींच्या मालकी हक्कांचे प्रश्न सुटणार असल्याचा विश्वासही महसूल मंत्री बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

### महसूल विभाग अधिक लोकाभिमुख करणार

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले, महसूल विभाग अधिक लोकाभिमुख करण्याबरोबरच तो अधिक सक्षम, गतिमान करण्यावर शासनाने भर दिला आहे. सर्वसामान्य जनतेला सेवा गतीने देण्यासाठी महसुली कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात येत आहेत. महसूल विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांची पदोन्नतीची प्रकरणे जलद गतीने मार्गी लावली जात आहेत. महसूलमंत्रीस्तरावर प्रलंबित असलेल्या केसेस/प्रकरणातील मागील आठ महिन्यात दोन हजार केसेस/ प्रकरणे मार्गी लावली आहेत. पुढील तीन वर्षांत एकही खटला प्रलंबित राहणार नाही असे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. राज्यात 'व्हर्टिकल सातबारा' देण्याचे नियोजन असून यात आधी मोजणी, मग खरेदीखत आणि त्यानंतर नोंदणी, अशी सुटसुटीत व्यवस्था असेल, असेही मंत्री बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. ■

# सोलापूरच्या असंघटित कामगारांच्या ३० हजार घरांचा मार्ग मोकळा

**सोलापूर** येथील असंघटित कामगारांसाठी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मौजे कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथे उभारण्यात येणाऱ्या ३० हजार घरांच्या प्रकल्पाला राज्य शासनाची दिलासादायक मंजुरी मिळाली आहे. या प्रकल्पासाठी अनर्जित, नजराणा रक्कमेसह अकृषिक वापर शुल्कातून सूट देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मौजे कुंभारी येथील दक्षिण सोलापूर येथील रे नगर फेडरेशन आणि संलग्न गृहनिर्माण संस्थांना एकूण २१ हे. आर. ६२ इतकी जमीन शासनाने गृहनिर्माण प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिली आहे. या जमिनींची अनर्जित रक्कम प्रति चौरस मीटर एक रूपया या नाममात्र दराने आकारण्यात येणार आहे. या निर्णयानुसार २१ हेक्टर ६२ आर जमिनीवरील १६ कोटी



९३ लाख ८९ हजार ३०० रुपयांची अनर्जित रक्कम तसेच आठ लाख पाच हजार २२४ रुपयांची थकीत अकृषिक कर थकबाकी माफ करण्यात येणार आहे. यामुळे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सोलापूर शहर व परिसरातील असंघटित कामगार, मजूर, लघुउद्योग व सेवा क्षेत्रातील कुटुंबांना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध होणार आहेत. ■

# विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिकेच्या भूसंपादनाच्या कर्जास शासन हमी

**विरार** ते अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिकेच्या भूसंपादनासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला हुडकोकडून घ्याव्या लागणाऱ्या दोन हजार कोटी रुपयांच्या कर्जास शासन हमी देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयानुसार विरार ते अलिबाग मार्गासाठीच्या भूसंपादनासाठी हुडकोचे दोन हजार कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यात येणार आहे. यामध्ये उभारण्यात येणाऱ्या कर्जास शासनाने हमी दिली आहे. तसेच यापूर्वीच्या हुडकोमार्फत निधी उभारण्यासाठीच्या शासन निर्णयात सुधारणा करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. यामुळे विरार ते अलिबाग मार्गाच्या भूसंपादनाचा प्रश्न सुटून, या मार्गाचे काम लवकरच सुरू होणार आहे. ही बहुउद्देशीय मार्गिका १२६.०६ कि.मी. लांबीची असेल. त्यापैकी मौजे नवघर (जि.पालघर) ते मौजे बलावली (ता.पेण) असे ९६.४१० कि.मी.चे पहिल्या टप्प्यातील काम बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्त्वावर हाती घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. ■

# नागपूरच्या लक्ष्मी नारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठास सात कोटी रुपयांचा निधी

**नागपूर** येथील लक्ष्मी नारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्थेस जीव रसायनशास्त्र, सूक्ष्म जीवशास्त्र आणि जैव तंत्रज्ञान विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी तसेच विद्यापीठाच्या नियमित कामकाज संचालनासाठी पाच वर्षांच्या कालावधीमध्ये चार समान हप्त्यांमध्ये सात कोटी रुपयांचा निधी देण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयानुसार लक्ष्मी नारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी संस्था या संस्थेस २०२५-२६ ते सन २०२९-३० या पाच वर्षांच्या कालावधीत दरवर्षी १ कोटी ७५ लाख रुपयांना प्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पहिला हप्ता एप्रिल ते जून २०२६ दरम्यान देण्यात येणार आहे. या संस्थेची स्थापन १९४२ ला झाली आहे. ही संस्था मध्य भारतातील रसायन तंत्रज्ञान क्षेत्रातील नावाजलेली संस्था असून रसायन तंत्रज्ञान क्षेत्रात पदवी ते संशोधन या टप्प्यात कार्य करते. या संस्थेला २०२३ मध्ये अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचा दर्जा देण्यात आला आहे. ■

# छत्रपती संभाजीनगरच्या पक्ष कार्यालयाचे उद्घाटन










छत्रपती संभाजीनगर येथील पक्ष कार्यालयाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बहुजन कल्याण व दुग्धविकास मंत्री अतुल सावे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा डॉ. विजया रहाटकर, ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर, ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील–दानवे, खा.डॉ.भागवत कराड, आ.बबनराव लोणीकर, ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, खा. अजित गोपछडे, आ. नारायण कुचे, आ. अनुराधा चव्हाण, मराठवाडा संघटन मंत्री संजय कौडगे, शिरीष बोराळकर आदी.



'नमो देवा भाऊ हृदय संजीवनी किट' चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन– उपस्थिती– महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस आ.संजय केनेकर, डॉ. वैद्यकीय आघाडीचे प्रदेश समन्वयक स्वप्नील मंत्री आदी.




धाराशिव– संपर्क कार्यालयाचे उद्घाटन– उपस्थिती– जिल्हा चिटणीस शिवशंकर हत्तरगे, मिथुन राठोड, जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, नितीन काळे, संताजी चालुक्य, मंडल अध्यक्ष सिद्धेश्वर माने, श्रीकांत मिणीयार, प्रशांत काळे, विक्रांत संगशेट्टी आदी.






ओबीसी मोर्चातर्फे वरळी कोळीवाडा येथे भाजपा कार्यकर्ता मयुरेश लाड यांस 'आत्मनिर्भर चहा' स्टॉल प्रदान– उपस्थिती– दै.तरुण भारतचे संपादक किरण शेलार, नरेंद्र गावकर, दीपक सावंत, स्वप्नील जगदाळे, राजू हळदणकर, ॲड. मनोज जयस्वाल, जितू कनोजिया, आरती पुगावकर, निलेश मानकर आदी.



नाशिक– महिला मेळावा– उपस्थिती– आ.देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे, आ.राहूल ढिकले, माजी आमदार निशिगंधा मोगल, महानगर जिल्हाध्यक्ष सुनील केदार, महिला मोर्चा अध्यक्ष स्वाती भामरे यांनी कार्यकारिणी घोषित करत सरचिटणीसपदी डॉ. पुष्पा पाटील, ललिता बिरारी, उज्वला बेलसरे, उपाध्यक्षपदी प्रियांका कानडे, लक्ष्मी पवार, यशोदा पर्वतकर, सुरेखा निकम, अनितादेवी राणा, ललिता भावसार आदींची नियुक्ती करण्यात आली.




प्रदेश कार्यालयात वंदे मातरम् १५० वर्ष पूर्ती सोहळा– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. राजेश वानखेडे, आ. प्रवीण पोटे–पाटील, प्रदेश सरचिटणीस आ. विक्रांत पाटील, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, माजी आमदार सुरेश हळवणकर, मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, कार्यालय सह प्रभारी सुमंत घैसास, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, ओमप्रकाश चौहान, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी, ज्येष्ठ नेते सुनील कर्जतकर आदी.




सातारा– उपस्थिती– जिल्हाध्यक्ष आ. डॉ. अतुल भोसले, आ.मनोज घोरपडे, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, माजी आमदार आनंद पाटील, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद देशपांडे, शहराध्यक्ष सुषमा लोखंडे आदी.



धाराशिव – उपस्थिती– जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, नितीन काळे, ॲड.नितीन भोसले, राहुल काकडे, नितीन शेरखाने, प्रीती कदम, मनीषा केंद्रे, विनोद निंबाळकर, विलास पवार, संदीप इंगळे, अभिजीत पतंगे, राजाभाऊ सोनटक्के, आकाश तावडे, शशिकांत माळाळे, रोहित देशमुख, प्रवीण पाठक आदी.




पुणे– त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त विविध संस्थांना ७५ कॉफी मग,१५० शाल, खेळणी व इतर उपयुक्त वस्तू भेट– उपस्थिती– संदीप खर्डेकर, मंजुश्री खर्डेकर, दिव्यांगांसाठी ३५ वर्षे काम करणाऱ्या सीमा दाबके, साई सेवा मतिमंद निवासी शाळा शिवणेचे संदीप फरगडे, ज्ञान गंगोत्री मतिमंद निवासी शाळा आंबेगावचे राजू नाईकवाडी, संतोष पोकळे, एनॅब्लेर चॅरिटेबल ट्रस्टचे राजेंद्र घावटे, अशोक बोत्रे आदी.



वेंगुर्ला– महिलांसाठी व्यवसायाकरिता मोफत प्रशिक्षण शिबिर– उपस्थिती– महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. सुषमा प्रभू–खानोलकर, तालुकाध्यक्ष सुजाता पडवळ, जिल्हा उपाध्यक्ष वृंदा गवंडळकर, शहर अध्यक्ष श्रेया मयेकर, तालुका चिटणीस चेतना राजपूत, माजी नगराध्यक्षा डॉ. पुजा कर्पे, वैभवी मालवणकर, आकांक्षा परब, कृपा मोंडकर, साक्षी पेडणेकर, प्रार्थना हळदणकर, रसिका मठकर आदी.



धाराशिव– बचत गटातील महिलांसाठी मार्गदर्शन मेळावा– उपस्थिती– माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, किरण आवटे, अशोक गायकवाड, सुधाकर निकम, देवानंद पाटील, बिभीषण मोरे, भीमराव झेंडे, रंजना सुतार, सुषमा गायकवाड, सचिन गायकवाड, प्रकाश घायतिडक, शंकर सुतार, मोहन केसकर, विनोद गायकवाड आदी.




उल्हासनगर येथील माजी नगरसेवक प्रधानशेठ पाटील, लोकगायिका निशा भगत, समाजसेवक रवि वशिता, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष आनंद शिंदे यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती – प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. सुलभा गायकवाड, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, शशिकांत कांबळे, कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, कल्याण जिल्हा निवडणूक प्रमुख नरेंद्र सूर्यवंशी, उल्हासनगर जिल्हाध्यक्ष राजेश वधारिया, उल्हासनगर जिल्हा निवडणूक प्रमुख प्रदीप रामचंदानी आदी.



डोंबिवली– प्रसिद्ध उद्योजक व शिवसेनेचे ज्येष्ठ पदाधिकारी संजयशेठ गायकवाड, माजी नगरसेवक देवानंद गायकवाड, पूजा गायकवाड, अनंता गायकवाड, अनिता कर्पे, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या लिना कर्पे, रामभाऊ ओहोळ यांचा प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. सुलभा गायकवाड, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, शशिकांत कांबळे, कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, उल्हासनगर जिल्हाध्यक्ष राजेश वधारिया, नरेंद्र सूर्यवंशी, प्रदीप रामचंदानी आदी.





उल्हासनगर विभाग क्रमांक १ चे शिवसेना उप विभाग प्रमुख विजय सिंग आणि माजी नगरसेविका रेखा ठाकूर यांचा प्रवेश.



डोंबिवली– लहु स्वराज्य सेनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष प्रकाश जाधव, सुहास थोरात, घनश्याम पवार, ओम पवार, दादू हनवते, आयुष थोरात यांचा प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. सुलभाताई गायकवाड, शशिकांत कांबळे आदी.



वसई-विरार- बहुजन विकास आघाडीच्या माजी नगरसेविका शकुंतला शेळके, गणेश धुमाळ, नागेश शेळके, जयेश धुमाळ, अंकुश शेळके, अनिल सिंग, वासंती धुमाळ, शिल्पा धनगर, रोहित पाटील, भारतीय लहुजी सेनेचे पालघर जिल्हा प्रमुख वेरशी भानुशाली, उबाठा गटाचे भोईदापाडा शाखाप्रमुख शशिकांत अवघडे, आकाश मालेकर यांचा प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. स्नेहा दुबे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, सूर्यकांत वाघमारे, प्रदेश कार्यालय सहसचिव भरत राऊत, राजू म्हात्रे, नंदकुमार महाजन, विजेंद्र कुमार आदी.



कर्जत-जामखेड येथील जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दत्ता वारे यांचा प्रवेश- उपस्थिती- विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आदी.



ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुभाष पवार यांचा मुरबाड तालुक्यातील असंख्य कार्यकर्त्यांसह प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ.किसन कथोरे, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील आदी.



डोंबिवली- काँग्रेसचे माजी प्रदेश सचिव संतोष केणे, कल्याण-डोंबिवली जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राहुल केणे, प्रणव केणे, माजी नगरसेविका वैशाली विद्याधर केणे, सोनाल दांडिया, किशोर काळण यांचा प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. सुलभा गायकवाड, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, जगन्नाथ पाटील, शशिकांत कांबळे, नंदू परब आदी.



डोंबिवली- कल्याण-डोंबिवली मनपा स्थायी समितीचे माजी सभापती दीपेश म्हात्रे, जयेश म्हात्रे, रत्ना म्हात्रे यांचा प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. सुलभा गायकवाड, आ. कुमार आयलानी, माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, जगन्नाथ पाटील, शशिकांत कांबळे, कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब आदी.



रत्नागिरी– मनविसे प्रदेश उपाध्यक्ष शैलेश धारिया, मनसेचे माजी रत्नागिरी तालुका शहर अध्यक्ष अद्वैत कुलकर्णी यांचा भाजपात प्रवेश – उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, माजी आमदार सूर्यकांत दळवी, माजी आमदार डॉ. विनय नातू, वैभव खेडेकर, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष सतीश मोरे, दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष राजेश सावंत, प्रशांत यादव आदी.



सिंधुदुर्ग– उबाठा गटाचे सावंतवाडी विधानसभा प्रमुख विक्रम सावंत, तालुकाप्रमुख मायकल डिसोजा, संजय कानसे, शिंदे गटाचे जिल्हा संघटक रुपेश पावसकर, प्रसाद नार्वेकर यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मत्स्योद्योग व बंदर विकास मंत्री नितेश राणे, प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत आदी.



चिपळूण– उबाठा गटाच्या उपशहर प्रमुख तेजस्वी किंजळकर, चिपळूणचे युवासेना समन्वयक सुयोग बलवलकर, कळमुंडीचे माजी पोलीस पाटील प्रमोद वंजारे आदींचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, माजी आ. सूर्यकांत दळवी, माजी आ. डॉ. विनय नातू, वैभव खेडेकर, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष सतीश मोरे, दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष राजेश सावंत, प्रशांत यादव आदी.



सोलापूरचे माजी महापौर स्व. महेश कोठे यांचे पुत्र स्थायी समितीचे माजी सभापती प्रथमेश कोठे, विनायक कोंड्याल, कुमुद अंकाराम, विठ्ठल कोटा, शशिकांत कैंची, मीरा गुर्रम, युवराज सरवदे, अक्षय वाकसे, तुषार पवार, परशुराम भिसे, संतोष सोमा, वासु यलदंडी, दिनेश गुर्रम, आकाश भोसले यांचा भाजपात प्रवेश – उपस्थिती – प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. देवेंद्र कोठे आदी.



इगतपुरी– उबाठा गटाचे माजी नगराध्यक्ष संजय इंदुलकर, माजी उपनगराध्यक्ष नईम खान, संपत डावखर, रमेश खापरे, रमेश म्हेत्रे, मधुमालती म्हेत्रे, अजय जगताप, संतोष जगदाळे, नितीन चांदवडकर, विजय जाधव, जयेश भंडारी यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, नाशिक जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव, गिरीश पालवे, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी.



लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष नाथसिंग देशमुख, रवींद्र काळदाते यांचा भाजपात प्रवेश– उपस्थिती– सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार, आ. रमेशअप्पा कराड, लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर आदी.



नाशिक-सिन्नर विधानसभा मतदारसंघामधील विधानसभा निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) पक्षाचे उमेदवार उदय सांगळे यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, आ. मंगेश चव्हाण, माजी केंद्रीय मंत्री भारती पवार, उत्तर महाराष्ट्र संघटन मंत्री रविंद्र अनासपुरे, नाशिक जिल्हाध्यक्ष सुनिल बच्छाव आदी.




नाशिक- माजी आमदार रामदास चारोस्कर, जि.प. माजी समाज कल्याण सभापती सुनिता चारोस्कर यांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ.सीमा हिरे, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी आदी.



ठाणे- भारतमाता युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक पाटील, नवनिर्मिती जनजाती फाऊंडेशनच्या अध्यक्ष जयश्री धसाडे, हिंदूराष्ट्र सेवा संघटनचे ठाणे विभाग प्रमुख कल्पेश कदम, हिंदूराष्ट्र सेवा संघटनचे उपाध्यक्ष संदेश जगताप, नवनिर्मिती जनजाती संघटनेच्या सहसचिव कविता वड, भिवंडी ग्रामीणचे युवासेना (उबाठा पक्ष) उप-तालुका प्रमुख गिरीश नाईक, उबाठा गटाचे विभाग प्रमुख भावेश जाधव यांच्यासह त्यांच्या समर्थकांचा भाजपात प्रवेश- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

________________________

________________________

________________________

________________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com